RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक ११४] गुरूवार, ऑक्टोबर २६, २०२३/कार्तिक ४, शके १९४५ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २३१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेप्रनि २०२३/प्र.क्र.७५/आस्थापना-१.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत केलेले इतर सर्व विद्यमान नियम, काढलेले आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील अभियांत्रिकी सेवेतील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), गट-ब, अराजपत्रित या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ :—**

(१) या नियमांस, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब, अराजपत्रित (सेवा प्रवेश) नियम, २०२३, असे म्हणावे.

(२) हे नियम, **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या-**या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(अ) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ, शासकीय सेवेतील संबंधित पदावर उमेदवाराची नियुक्ती करण्यासाठी सक्षम असलेले विभागाचे प्रभारी मंत्री, असा आहे ;

(ब) "पदवी" याचा अर्थ, एखाद्या सांविधिक विद्यापीठाची पदवी किंवा तिच्याशी समतुल्य असल्याचे शासनाने घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता, असा आहे ;

(क) "पदविका" याचा अर्थ, एखाद्या सांविधिक विद्यापीठाची किंवा परिसंस्थेची पदविका, असा आहे ;

(ड) "ज्येष्ठता अधीन पात्रता" याचा अर्थ, ज्येष्ठता सूचीप्रमाणे ज्येष्ठतेनुसार आणि सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयाद्वारे आणि याबाबतीत वेळोवेळी काढलेल्या पुढील आदेशांद्वारे पदोन्नतीसाठी विहित केलेल्या अटी व शर्ती यांनुसार असलेली पात्रता, असा आहे ;

(ई) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(फ) "सार्वजनिक बांधकाम विभाग" याचा अर्थ, शासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग, असा आहे ;

(ग) "निवड समिती" याचा अर्थ, शासकीय सेवेतील गट-ब (अराजपत्रित) व गट-क पदांच्या भरतीकरिता उमेदवारांच्या निवडीच्या प्रयोजनार्थ शासनाने वेळोवेळी घटित केलेली निवड समिती, असा आहे.

३. **नियुक्तीचा मार्ग :—** कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब, अराजपत्रित या पदावरील नियुक्ती एकतर,—

(अ) स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, गट क हे पद धारण करणाऱ्या आणि त्या पदावर सात वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा असणाऱ्या आणि महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी (META) द्वारे आयोजित केलेली कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब, अराजपत्रित पदाची व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण असलेल्या किंवा सामान्य प्रशासन विभागाने शासन आदेशाद्वारे वेळोवेळी निश्चित केलेल्या वयोमर्यादेनुसार व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेल्या व्यक्तींमधून, योग्यतेस अधीन राहून, ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल; किंवा

(ब) जे उमेदवार, पुढील निकषांची पूर्तता करतात अशा, त्यासाठी निवड समितीने घेतलेल्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालांच्या आधारे शिफारस केलेल्या उमेदवारांमधून, नामनिर्देशनाद्वारे, करण्यात येईल :—

(एक) वयोमर्यादा—

(क) किमान वयोमर्यादा.—अठरा वर्षे पूर्ण केलेले ;

(ख) कमाल वयोमर्यादा.- खुल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी अडतीस वर्षे पूर्ण केलेले व मागास प्रवर्गातील व्यक्तींसाठी त्रेचाळीस वर्षे पूर्ण केलेले ;

(ग) वयोमर्यादेची गणना.- संबंधित पदाच्या भरतीच्या जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास, वरील किमान व कमाल वयोमर्यादा पूर्ण केलेली असणे आवश्यक असेल.

(दोन) किमान शैक्षणिक अर्हता - स्थापत्य अभियांत्रिकीतील किमान पदविका किंवा पदवी अथवा त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेली व्यक्ती.

४. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्ती, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने, अनुक्रमे, ६०: ४० या प्रमाणात करण्यात येईल.

५. **व्यावसायिक परीक्षेची तरतूद :—** नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे, नियुक्त केलेल्या व्यक्तीस, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील प्रकरण ८ च्या परिशिष्ट-१ च्या उप विभाग-३ अन्वये निर्धारित केलेल्या प्रक्रियेनुसार व नियमांनुसार विहित कालावधीत व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली नसेल तर, त्या व्यक्तीने ही उत्तीर्ण होणे आवश्यक असेल, अन्यथा ती व्यक्ती, परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावर पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही आणि ती, तिची ज्येष्ठता गमावेल.

६. **हिंदी व मराठी भाषा परीक्षेसंबंधी तरतूद :—**(१) नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी अगोदरच हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, तिने, त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

(२) नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, अगोदरच हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती व्यक्ती, त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील. ती व्यक्ती, या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदांवरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

७. **संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यासंबंधी तरतूद :—** (१) नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती व्यक्ती, त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार किंवा काढलेल्या आदेशांनुसार विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करील.

(२) नियम ३ मध्ये नमूद पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्ती, तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती व्यक्ती, याबाबतीत शासनाने वेळोवेळी विहित केलेले असे संगणक हाताळणी प्रमाणपत्र, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत धारण करील, अन्यथा, ती व्यक्ती, ते प्रमाणपत्र धारण करीपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

८. **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन करण्यासंबंधी तरतूद :—**(१) नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शिफारस केलेली व्यक्ती, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ च्या तरतुदींनुसार आणि याबाबत शासनाने वेळोवेळी केलेले अन्य कोणतेही नियम, काढलेले आदेश किंवा कोणतेही संलेख यांनुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करील.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करण्याच्या दिनांकाला दोनपेक्षा अधिक अपत्ये असणारी व्यक्ती, शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र असेल.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर तिला नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिद्ध झाले तर, ती व्यक्ती, शासकीय सेवेतील उक्त पदावर कायम राहण्यासाठी अपात्र असेल.

९. **बदली संबंधी तरतूद :—** नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्रात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.

१०. **शासकीय सेवेत प्रवेश केल्यानंतर सेवेशी संबंधित असणारे इतर आदेश व नियम लागू असणे :—** कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीनंतर, शासनाने वेळोवेळी केलेले कोणतेही नियम, काढलेले आदेश किंवा निर्णय यांमध्ये शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती देखील अशा शासकीय कर्मचाऱ्यास लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय द. दशपुते,**
शासनाचे सचिव (बांधकामे).

## PUBLIC WORKS DEPARTMENT

Mantralaya,Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 26th October 2023.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. RTR-2023/C.R.75/Establishment-1.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all other existing rules, orders or instruments issued in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitments to the post of Junior Engineer (Civil), Group-B Non-Gazetted, in the Engineering Service under the administrative control of the Public Works Department of the Government of Maharashtra, namely :—

**1.** *Short Title and commencement*.—(1) These Rules may be called the Junior Engineer (Civil), Group-B, Non-Gazetted (Recruitment) Rules, 2023.

(2) These rules shall come into force on the date of publication of these rules in the *Government Gazette*.

**2.** *Definitions*.— In these rules unless the context requires otherwise,

(*a*) "Appointing Authority" means the authority of the Minister in-charge of the Department competent to appoint a candidate to the relevant post in the Government Service ;

(*b*) "Degree" means a degree of a statutory university or any other qualification as may be declared by the Government to be equivalent thereto ;

(*c*) "Diploma" means a diploma of a statutory University or Institution ;

(*d*) "Eligibility subject to the Seniority" means the eligibility in accordance with seniority as per the seniority list and in accordance with the terms and conditions prescribed for promotion *vide* Government Resolution, General Administration Department dated 01.08.2019 and further orders issued in this behalf from time to time.

(*e*) "Government" means the Government of Maharashtra ;

(*f*) "Public Works Department" means the Public Works Department of the Government ;

(*g*) "Selection Committee" means a Selection Committee constituted from time to time by the Government for the purpose of selection of the candidates for recruitment to the Group-B (Non-Gazetted) and Group-C posts in the Government Service.

**3.** *Mode of Appointment*.—Appointment to the post Junior Engineer (Civil), Group-B, Non-Gazetted, shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable persons on the basis of seniority subject to fitness from amongst the person holding the post of Civil Engineering Assistant, Group C and having not less than seven years regular and continuous service on that post and has passed the Professional Examination Junior Engineer (Civil) Group-B, Non-Gazetted conducted by Maharashtra Engineering Training Academy (META) or has been exempted from passing the professional examination as per the age limit fixed by the General Administration Department from time to time as per the Government Order ; or

(*b*) by nomination from amongst the candidates recommended on the basis of the results of the competitive examination conducted by the Selection Committee, who fulfills the following criteria, namely :—

(*i*) Age limit :—

(A) Lower Age Limit.—Eighteen years completed ;

(B) Upper Age Limit.—Thirty-eight years completed for the persons belonging to open category and forty-three years completed for the persons belonging to backward category ;

(C) Reckoning of age limit.—It shall be necessary to fulfill above lower and upper age limit on the final date of receipt of applications as stated in the advertisement for recruitment to the concerned post.

(*ii*) minimum educational qualification.—A person holding a minimum diploma or degree or higher educational qualification in Civil Engineering.

**4.** Appointment to the person mentioned in rule 3 shall be made by promotion and nomination, in the ratio of 60:40.

**5.** *Provision of Professional Examination* :—A person appointed by nomination to the post mentioned in rule 3 shall be required to pass the professional examination within the prescribed period as per the procedure and rules laid down under sub-section-*3* of Appendix-1 of Chapter 8 of the Maharashtra Public Works Rule Book unless he has been exempted from passing the examination, otherwise he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possess the same and he will lose his seniority.

**6.** *The Provision regarding Hindi and Marathi Language Examination* :—(1) A person appointed to the post mentioned in rule 3 by promotion shall be required to pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations, before promotion to the said post.

(2) A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passes those examinations.

**7.** *Provision regarding possessing Certificate in Computer Operation* :—(1) A person appointed to the post mentioned in rule 3 by promotion shall possess a Certificate of Computer Operations prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has exempted therefrom before promotion to the said post.

(2) A person appointed to the post mentioned in rule 3 by nomination shall possess a Certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such Certificate of Computer Operations, otherwise he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possess the same.

**8.** *Provision regarding Declaration of Small Family* :— (1) A person recommended for appointment by nomination to the post mentioned in rule 3 shall submit a Declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Small Family Declaration) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(2) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family shall be disqualified for the appointment in the Government service.

(3) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in the Government service.

**9.** *Provision regarding transfers* :—A person appointed to the post mentioned in rule 3 shall be liable for transfer anywhere in Maharashtra.

**10.** *Applicability of other Orders or Rules regarding Services after entry into Government Service* :— The terms and conditions specified by the Government, subsequent to the appointment of any Government servant in any rules, orders or resolutions issued by the Government, from time to time, shall also be applicable to the Government servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY D. DASHPUTE,
Secretary (Works) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.